तालुका,जिल्हा आणि राज्यस्तरावरील बैठकांमध्ये वृक्ष लागवड आणि संगोपन हा मुद्दा स्थायी विषय म्हणून बैठकांच्या विषयसूचीमध्ये आणि क्षेत्रीय स्तरावरील निरिक्षण भेटीमध्ये अंतर्भूत करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१९३/का-११.
मंत्रालय,मुंबई-४०००३२
दिनांक: ०७ डिसेंबर, २०१७

वाचा :- १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक-साववि-२०१६/प्र.क्र.१३१/फ-११,दि.३१.०३.२०१६.
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक-साववि-२०१६/प्र.क्र.८०/फ-११,दि.१०.१०.२०१६.
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक-साववि-२०१६/प्र.क्र.१६६/फ-११,दि.०४.०१.२०१७.

प्रस्तावना :-

हवामान आणि ऋतूबदल, वाढते तापमान, दुष्काळ आणि पाण्याचे दुर्भिक्ष या नैसर्गिक आपत्तींची दाहकता आणि तीव्रता कमी करण्यासाठी हरित महाराष्ट्र ही संकल्पना राबविण्याचा महत्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. या कार्यक्रमांतर्गत सन २०१७ते २०१९ या कालावधीत ५० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठरविण्यात आले असून, सन २०१७ मध्ये ४ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमाची अंमलबजावणी झाली आहे. त्याशिवाय सन २०१६ मध्ये दि.१ जुलै, २०१६ या एकाच दिवशी २ कोटी वृक्ष लागवडीचा आगळा वेगळा व महत्वाकांक्षी कार्यक्रम कार्यान्वित करण्यात आला.

२. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दि.१० ऑक्टोबर, २०१६ अन्वये या कार्यक्रमाचे विनियोजन आणि अंमलबजावणी संदर्भात सविस्तर सूचना निर्गमत करण्यात आल्या आहेत. त्यास अनुसरुन या विभागाच्या शासन परिपत्रक क्र.आस्था-२०१६/प्र.क्र.१०८/का-१, दि.०६/०१/२०१७ अन्वये सन २०१७ ते २०१९ या कालावधीत दरवर्षी वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाबाबतचे विनियोजन आराखडा व कृती कार्यक्रम राबविण्याबाबत सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सन २०१८ आणि सन २०१९ मध्ये अनुक्रमे १३ कोटी आणि ३३ कोटी वृक्ष लागवडीचे उदिष्ट आहे. वृक्ष लागवडीचे उदिष्ट पूर्णपणे साध्य व्हावे आणि त्याचबरोबर आतापर्यंत लागवड केलेल्या झाडांचे संरक्षण, देखभाल आणि संगोपन उत्तमरितीने होणे हे अत्यंत गरजेचे आहे. सन २०१८ मधील नियोजित १३ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत नियोजन आणि पूर्वयतयारीबाबत दिनांक १६ नोव्हेंबर, २०१७ रोजी सचिव (वने) यांच्या अध्यक्षतेखाली सर्व प्रशासकीय विभागांच्या समन्वय अधिका-यांची बैठक संपन्न झाली. प्रस्तुत बैठकीच्या अनुषंगाने महसूल व वन विभागाकडून निर्गमित केलेल्या दि.१८.११.२०१७ च्या इतिवृत्तातील अनुक्रमांक ५ येथील निर्णयास अनुसरून पुढीलप्रमाणे सूचना प्रस्तूत करण्यात येत आहेत.

शासन परिपत्रक :-

(अ) महिला व बाल विकास विभागांतर्गत क्षेत्रीय स्तरावरील तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरीय बैठकांमध्ये वृक्ष लागवड आणि संगोपन या संदर्भातील विषय प्रत्येक बैठकांच्या वेळी विषयसूचीमध्ये स्थायी विषय म्हणून अंतर्भूत करण्यात यावा.

(आ) अशा बैठकांमध्ये वृक्ष लागवडीचा आढावा, या पूर्वी लावलेल्या झाडांचे जिवंत राहण्याचे प्रमाण, मृत झाडांच्या जागी नवीन झाडांची लागवड, पुढील वर्षांमध्ये वृक्ष लागवडीच्या उद्दिष्टांप्रमाणे वृक्षारोपणासाठी स्थळ निश्चिती, रोपांची उपलब्धता, आवश्यक त्या तांत्रिक परिमाणाप्रमाणे विहित कालावधीमध्ये पिट्स तयार करणे, निधीची उपलब्धता इत्यादी संदर्भात पूर्व तयारीबाबत आढावा घेण्यात यावा.

(इ) अशा बैठकांमध्ये वृक्ष लागवड कार्यक्रमासंदर्भात झालेल्या निर्णयांची नोंद बैठकीच्या इतिवृत्तामध्ये करण्यात यावी. तसेच इतिवृत्तामध्ये नमूद केलेल्या निर्णयासंदर्भात झालेल्या अंमलबजावणीबाबत आणि येणा-या अडचणी संदर्भात पुढील बैठकीमध्ये चर्चा होऊन क्षेत्रीय अधिका-यांना येणा-या समस्या आणि अडचणी सोडविण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात.

(ई) तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरावरील जे अधिकारी क्षेत्रीय कामांना भेटी देतील, त्यावेळी त्या त्या स्तरावरील वृक्ष लागवडीच्या स्थळांना आवर्जून भेटी देण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात यावा. अशा क्षेत्रीय भेटीच्या वेळी संबधित कार्यालय स्तरावर लावलेल्या झाडांचे संरक्षण योग्यरितीने होते किंवा नाही, मृत झाडांच्या बदल्यात नवीन झाडे लावली गेली किंवा नाही, पाण्याची व्यवस्था आणि संरक्षणासाठी मनुष्यबळ इत्यादी बाबींची वरिष्ठ अधिका-यांनी पाहणी करावी. त्याचप्रमाणे येणा-या अडचणी सोडविण्याबाबत उपाययोजना कराव्यात.

(उ) तसेच प्रस्तावित वृक्ष लागवडीसाठी निवडलेली स्थळे, आवश्यक त्या परिमाणाचे पिट्स विहित वेळेत तयार करणे आणि अशा स्थळांवर लावण्यात येणा-या झाडांसाठी पाण्याची आणि संरक्षण व्यवस्था,वृक्ष लागवडीसाठी निधीची व्यवस्था, याबाबत देखील पाहणी करुन क्षेत्रीय अधिका-यांना आवश्यक ते मार्गदर्शन करावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून,त्याचा संगणक सांकेताक २०१७१२०७१५२५१७६४३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2017.12.07 15:29:11 +05'30'

(ला.रा.गुजर)

उपसचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. विरोधी पक्षनेते, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
२. सर्व सन्माननीय विधानपरिषद/विधानसभा सदस्य व सांसद सदस्य, महाराष्ट्र राज्य
३. मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई.
४. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रायल, मुंबई.
५. मा.मंत्री,(वने),यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
६. मा.मंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा. राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव , मंत्रालय, मुंबई.
८. मा.मुख्य सचिव, यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक ,महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
९. मा. सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. मा. सचिव, महिला व बाल विकास विभाग,मंत्रालय, मुंबई.
११. आयुक्त, महिला व बाल विकास,महाराष्ट्र राज्य,पुणे.
१२. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई.
१३. सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग,मुंबई .
१४. व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ,मुंबई.

१५. सचिव, महाराष्ट्र राज्य समाजकल्याण बोर्ड,चेंबुर मुंबई.
१६.सचिव,महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग,वरळी,मुंबई.
१७. मुख्य अधिकारी,चिड्रेन्स एड सोसायटी,मुंबई
१८. सर्व विभागीय उपआयुक्त /सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी(आयुक्त, महिला व बाल विकास,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे मार्फत)
१९. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,जिल्हा परिषद/सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (आयुक्त, आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई यांचे मार्फत)
२०. सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.
२१. निवड नस्ती.(का.११) महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.